## ‘मेट्रो-३’ ची धाव आता नेव्ही नगरपर्यंत

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेचा विस्तार कफ परेड ते नेव्ही नगर असा करण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) घेतला आहे. त्यानुसार हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी एमएमआरसीकडून अखेर मंगळवारी सल्लागाराच्या निवडीसाठी स्वारस्य निविदा मागविण्यात आल्या आहेत. – **पान ४**

# मेट्रो ३ ची धाव आता नेव्ही नगरपर्यंत

### सल्लागाराच्या नियुक्तीसाठी निविदा जारी

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेचा विस्तार कफ परेड ते नेव्ही नगर असा करण्याचा निर्णय मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) घेतला आहे. त्यानुसार हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी एमएमआरसीकडून अखेर मंगळवारी सल्लागाराच्या निवडीसाठी स्वारस्य निविदा मागविण्यात आल्या आहेत. या निविदेनुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यासह प्रकल्पाचा सामाजिक प्रभाव मूल्यांकन आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल तयार करण्याची जबाबदारी सल्लागारावर असणार आहे.

एमएमआरसीकडून ३२.५ किमीच्या भुयारी मेट्रो ३ चे मार्गिकेचे काम सुरू आहे. या मार्गिकेतील सीप्झ ते बीकेसी हा पहिला टप्पा २०२४ मध्ये पूर्ण करण्याचे एमएमआरसीचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी आणि मेट्रो ३ वेगाने पुढे नेण्यासाठी राज्य सरकारने अश्विनी भिडे यांच्याकडे मेट्रो ३ ची जबाबदारी सोपवली आहे. त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर कामाला वेग दिला आहे. आरे कारशेडचे कामही सुरू केले आहे.